क्र. मपविम/ नि.का/व. नागरिक/सवलत/२०१२ /१५२
निवासकार्य शाखा,
दिनांक : 11 FEB 2013

## ॥ परिपत्रक ॥

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जेष्ठ नागरिकांचे निवृत्ती नंतरचे आयुष्य आनंददायी होण्याकरिता महामंडळाच्या पर्यटक निवासातील सर्व प्रकारच्या खोल्यांच्या दरावर सवलत जाहीर करण्यात येत आहे. या सवलतीस ६५ वर्षावरील सर्व जेष्ठ नागरिक पात्र असतील. जेष्ठ नागरिकांना पुढील अटी शर्ती नुसार सवलत उपलब्ध करण्यात येईल :

१. जेष्ठ नागरिकांना निवासातील सर्व प्रकारच्या खोल्यांवर २०% सवलत देण्यात येईल.
२. जेष्ठ नागरिकांना खोल्यांवर सवलत फक्त सोमवार ते गुरुवार या कालावधीत देण्यात येईल.
३. ही सवलत आगाऊ आरक्षण करणाऱ्या जेष्ठ नागरिकांना उपलब्ध होईल.
४. जेष्ठ नागरिकांना आरक्षण करतेवेळी वयाचा दाखला उदा. जेष्ठ नागरिक ओळख पत्र, वाहनचालक परवाना, पासपोर्ट, आधार कार्ड अथवा मतदान ओळखपत्र यापैकी एक पुरावा सादर करणे अनिवार्य आहे.
५. वरील पुराव्याची छायांकित प्रत असल्यास मूळ प्रत दाखविण्यासाठी सोबत ठेवावी.
६. ही सवलत MTDC स्वत: चालवत असलेल्या पुढील पर्यटन निवासासाठी अनुज्ञेय असेल :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गणपतीपुळे | १०. | फर्दापूर |
| २. | महाबळेश्वर | ११. | भंडारदरा |
| ३. | माथेरान | १२. | माळशेज घाट |
| ४. | हरिहरेश्वर | १३. | चिखलदरा |
| ५. | तारकर्ली | १४. | पानशेत |
| ६. | तारकर्ली हाऊस बोट | १५. | हॉटेल पिलग्रीम्स इन, शिर्डी |
| ७. | ताडोबा | १६. | कार्ला |
| ८. | वेळणेश्वर | १७. | पर्यटक स्वागत केंद्र, नागपूर |
| ९. | अजिंठा टी जंक्शन | १८. | टिटवाळा |
| | | १९. | तुळजापूर |

व्यवस्थापकीय संचालक,
मपविम, मुंबई.